# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:12.04.2026** **वार: रविवार**

1. -पुणे जिल्ह्यात खानवडी इथं जिल्हा परिषदेच्या ज्योती-सावित्री सीबीएसई शाळेचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन.
2. -क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमातून त्यांना अभिवादन.
3. -नवी दिल्लीत पहिल्या महिला शासकीय अधिकारी साहित्य संमेलनाचं आयोजन.आणि
4. -शालेय बसचं शुल्क, प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून निश्चित करण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव.

## जिल्हा परिषद शाळा-मुख्यमंत्री

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचं मुळगाव खानवडी इथं पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेल्या पहिल्या सीबीएसई ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचं' उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभा आणि विधानसभेत 33 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे; तो महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्री-शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून ही त्यांना खरी आदरांजली असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना केलं. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली असून भविष्यात अशी एक हजार केंद्रे उभारण्यात येतील असे फडणवीस यांनी सांगितले. ते म्हणाले…

**आज मला अतिशय आनंद आहे की महात्मा ज्योतिबा फुले यांची द्विजन्मशताब्दी कुठून आपण सुरू करावी त्याचा पहिला कार्यक्रम कुठे घ्यावा अशा प्रकारचा विचारविनिमय सुरू करताना आमच्या नजरेस ही बाब आली की त्यांचं पैतृक गाव खानापूर या ठिकाणी जिल्हा परिषदेने अतिशय सुंदर अशा प्रकारची ही ज्योती सावित्री शाळा सुरू केली आहे आणि त्याच्या उद्घाटन जन्मशताब्दी सोहळ्याची सुरुवात होणं हे खऱ्या अर्थानं त्यांच्या विचाराला केलेली एक मानवंदना ठरेल पहिल्या टप्प्यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्रांचं उद्घाटन केलेलं आहे आणि पुढच्या काळामध्ये महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे एक हजार केंद्र हे आपण उभारणार आहोत आणि त्यातनं कौशल्य प्रशिक्षित अशा प्रकारचं मानव संसाधन हे उभं करण्याचं काम हे या ठिकाणी आपण करणार आहोत**

महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते प्रगतशील शेतकरी, यशस्वी उद्योजक आणि दूरदृष्टीचे विचारवंत होते. शेतीत नवनवीन प्रयोग करून शेतकऱ्यांना वर्षभर उत्पन्न मिळवून देणारं मॉडेल त्यांनी तयार केलं. शेतकऱ्यांवरील अन्यायाविरुद्ध त्यांनी लढा दिला. मुंबई महानगरपालिकेची इमारत, खडकवासला धरण, येरवडा कारागृह आणि कात्रज बोगदा यांसारख्या प्रकल्पांमध्ये त्यांची दूरदृष्टी दिसून येते, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना नमूद केलं. या कार्यक्रमाला मंत्री छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, दादाजी भुसे, आदी उपस्थित होते.

## म. फुले जयंती

स्त्री शिक्षणाचे प्रणेते, थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त काल देशभरात त्यांना अभिवादन करण्यात आलं. महात्मा फुले यांच्या 200 व्या जयंती वर्षाला कालपासून सुरुवात झाली; यानिमित्तानं संपूर्ण राज्यसह देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. ऐकुया अधिक हा वृत्तांत..

**क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती निमित्त संसद भवनात प्रेरणा स्थळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन,पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभापती ओम बिर्ला, विरोधी पक्ष नेते राहुल गांधी,आणि अन्य मंत्र्यांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं. लोकभवन इथं राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी तर विधानभवनातही महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमध्यमांवरील संदेशामधून महात्मा फुले यांना अभिवादन केलं. पुण्यात समता भूमी भिडे वाडा इथल्या महात्मा फुले यांच्या स्मारकस्थळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण केली. तसंच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय तसंच विविध सामाजिक संस्थामधून महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आलं. कोल्हापूर मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्राच्यावतीनं सुरु असलेल्या फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत महात्मा फुले यांच्या 199 व्या जयंतीनिमित्त “महात्मा फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म” या विषयावर व्याखानाचं आयोजन कारण्यात आलं होतं. तर अकोल्यात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीनं जयंती महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी विविध सामाजिक उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. त्याबरोबरच राज्यात इतरत्रही महात्मा फुले यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आलं. आकाशवाणी बातम्यांसाठी यांच्या ठीकठिकाणच्या वार्ताहरांसह पूजा दीक्षित पुणे**

**साहित्य संमेलन**

मनाची तरलता जीवंत ठेवण्यासाठी साहित्य निर्मिती आवश्यक आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. राज्यातील महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन काल नवी दिल्लीत त्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. मराठी भाषा मंत्री उदय सामंत, संमेलनाच्या अध्यक्ष ज्येष्ठ लेखिका, माजी अतिरिक्त मुख्य सचिव लीना मेहंदळे, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन आणि पुण्याच्या सरहद संस्थेनं या संमेलनाचं आयोजन केलं आहे. महाराणी ताराराणी यांचं हे 351 वं जयंती वर्ष आहे; त्यांचं स्मरण म्हणून संमेलनाच्या मुख्य स्थळाला छत्रपती महाराणी ताराराणी दालन असं नाव देण्यात आलं आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेची समृद्धी विशद केली; तसंच महाराणी ताराबाई यांच्या पराक्रमाचा गौरव केला. संगणक प्रणालीवर मराठी भाषेमध्ये साहित्य निर्मिती अधिक सुलभ सहज करण्यासाठी प्रयत्न करावेत, असं आवाहन संमेलनाध्यक्ष लीना मेहंदळे यांनी यावेळी केलं. तत्पूर्वी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात ग्रंथदिंडीनं या साहित्य संमेलनाचं उद्घाटन झालं.

**शालेयबस**

प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून शालेय बसचं शुल्क निश्चित करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं सादर केला आहे. यानुसार पालकांकडून केवळ मासिक शुल्क घेतलं जाईल, एकरकमी आगाऊ रक्कम घ्यायला सरकारनं मनाई केली आहे. बसमधला विद्यार्थी किती वाजता आला आणि किती वाजता उतरला या वेळेसह त्याची दैनिक उपस्थिती नोंद बंधनकारक करण्यात आली आहे. पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनात महिला परिचर असणं आवश्यक असेल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. सर्व शालेय बस आणि व्हॅनमध्ये GPS-आधारित Vehicle Location Tracking Device, पॅनिक बटण, अग्निसुरक्षा यंत्रणा, CCTV तसंच सर्व सीट्ससाठी सीट बेल्ट सक्तीचे आहे. बस चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्रही सरकारनं अनिवार्य केलं आहे. प्रत्येक शाळेत परिवहन समिती कार्यरत असेल.भाडे, सुरक्षा आणि सेवा यासंबंधी पालकांच्या तक्रारींचे निवारण समितीच्या माध्यमातून करण्यात येईल.

**संमेलन-नाशिक**

नाशिक जिल्ह्यात चांदवड इथं काल सहाव्या आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते याचं उद्घाटन झालं. संमेलनाध्यक्ष म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर उपस्थित होते.

**अंधजन संमेलन**

पुणे अंधजन मंडळातर्फे 'आंतरज्योती' ब्रेल साहित्य संमेलनाचं आयोजन काल करण्यात आलं होतं. ज्येष्ठ अभिनेते आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण आणि गझलकार ममता सपकाळ यावेळी उपस्थित होत्या. दृष्टिबाधितांच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या दत्तात्रय जाधव यांना यावेळी आंतरज्योती गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी दृष्टीबाधित कलाकारांनी कविता आणि गाणी सादर केली.

**गाळमुक्त धरण**

गाळमुक्त धरण आणि  गाळयुक्त शिवार ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांना खूप उपयोगी आहे. या योजनेची व्याप्ती राज्यात वाढवणार असल्याचं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. सातारा जिल्हाधिकारी कार्यालय आणि नाम फाउंडेशन यांनी संयुक्तपणे कोयना धरणातील  गाळ काढण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे याचा शुभारंभ महाबळेश्वर तालुक्यातील दरे इथं शिंदे यांच्या काल हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

**आशाभोसले**

ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे काल मुंबईतील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**भूकंप**

विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना काल भूकंपाचा धक्का जाणवला. नांदेड, परभणी, हिंगोली, चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्याच्या काही भागात हा भूकंप झाला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भूकंप मापक यंत्रावर या भूकंपाची नोंद झाली असून 4 पूर्णांक 7 रिश्टर स्केल एवढी तीव्रता असल्याचं या विभागाचे प्रमुख डॉक्टर टी. विजयकुमार यांनी सांगितलं. या भूकंपामुळे अनेक भागात घरांना तडे गेले, तर काही भागात कच्च्या घरांची पडझड झाली. या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्याच्या वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे परिसरात होता.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात उन्हाची तीव्रता वाढली आहे. काल सोलापूर आणि नाशिक जिल्ह्यात कमाल तापमान 41 अंशांवर गेलं होतं. येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून विदर्भ आणि मराठवाड्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.